

छायाचित्र - नासा व एसटीएससीआयच्या सौजन्याने

# हबल खजिना

दिवाळीच्या दिवसांत आपण फटाक्यांची नयनरम्य आतषबाजी पाहतो, पण अशी आतषबाजी फक्त पृथ्वीवर होते असे समजू नका. अशीच सुंदर दृश्ये अंतराळातही दिसू शकतात. आपल्या आकाशगंगेजवळ एक छोटा ढग आहे, त्याचं नाव आहे स्मॉल मेगलानिक क्लाउड. त्यात एका ताऱ्याचा स्फोट झाला त्या वेळी टिपलेले हे नितांतसुंदर छायाचित्र . खालच्या बाजूला दिसणारा निळा रंग त्या ताऱ्याच्या आत असलेल्या द्रव्यामुळं दिसतो आहे, अशा छायाचित्रांचा उपयोग वैज्ञानिक ताऱ्यांच्या अभ्यासासाठी करून घेतात. हा ढग आपल्याजवळ आहे असं मी म्हटलं खरे, पण त्यासाठी खगोलशास्त्रातलं मोजमाप वापरायचं तर त्याचे अंतर आपल्यापासून आहे २,१०,००० प्रकाशवर्ष.

संकलन- प्रा.गिरीश पिंपळे